

# जागे व्हा . . . . . .

**“ विज्ञान आहे मानवाचा खरा सोबती,**
**त्यानचं उतरवली पृथ्वीवर प्रगती,**
**पण मानवाने केली पृथ्वीचीच फजिती,**
**कारण प्रगती सोबती आली ग्लोबल वार्मींगची धास्ती. ”**

आज संपूर्ण विश्वाला आपल्या जाळयात ओढून घेणारी महाभयंकर राक्षसासारखी अक्राळ विक्राळ रूप धारण केलेली समस्या कोणती असेल? असं विचारल तर पहिली दुसरीचा मलगाही सहज उत्तर देऊन जातो, ग्लोबल वार्मींग. विज्ञान! ज्या विज्ञानानं असाध्य ते ते सर्व साध्य केलं, ज्याला आपण आजच्या युगाची कामधेनु म्हणू शकतो, अस हे विज्ञान! या विज्ञानाला हजारो वर्षापूर्वीची मानवाची दयनीय अवस्था बघवली नाही, म्हणून मानवाच्या कल्याणासाठी गाडया, विमानं तयार झाली. कारखाने निर्माण झाले. पण माणूस स्वार्थी, लोभी! हव्यासापोटी त्यानं या विज्ञानाची मदत घेऊन दहा म्हणता म्हणता लाखो गाडया, कारखाने बनविले. त्याचाच दुष्परिणाम म्हणजे ग्लोबल वार्मींग. मानवाच्याच अनेक कारनाम्यांमुळे $CO_2$, CO, $N_2O$, Ozone, Methane, CFCs या सर्वांनी पृथ्वीवर थैमान मांडले आहे. सर्वच जगाला नष्ट करण्याची शक्ती या ग्लोबल वार्मींगमध्ये आहे. ती शक्ती वाढविण्याचे कार्य माणूसच करीत आहे. एकतर पहिल्यांदा जनसंख्या वाढवायची, नंतर जागा नाही, अन्न योग्य प्रमाणात उपलब्ध नाही म्हणून आपल्या सारखाच सजीव असणाऱ्या त्या वृक्षांवर कुऱ्हाडीचा घाव घालायचा.

नंतर उगीचचं अनेक विश्व–परिषदेत, G-8 च्या परिषदेत, लोकसभेत, विधानसभेत, राज्यसभेत अजेंडा पॉईंट म्हणूनही ग्लोबल वार्मींगलाच उचलायचं. अहो, पण फक्त चर्चा करून, परिषदेत विषय मांडून काय ग्लोबल वार्मींग कमी होणार आहे? तुम्ही मग त्या सभा चंद्रावर जाऊन घ्या नाहीतर, पाण्यात किंवा शिखरावर जाऊन घ्या. फक्त बोलून काही होत नसतं, महत्वाची असते ती कृती!

या सर्व सभांवर, परिषदांवर जो पैसा खर्च होतो, त्या सर्व पैशांची झाडे विकत घ्या. ती लावा आणि जतन करा. फक्त एकच झाड वर्षाला 120kg ऑक्सिजन देतं. असा सरकारी नियमच बनवा, की प्रत्येक शाळेत यावर्षी, किमान पन्नास झाडे तरी लावलीच पाहिजेत. विद्यार्थ्यांना झाडे जगविण्यासाठीही श्रेणी (Grades) द्या, यामुळे त्यांना एक प्रकारचे प्रोत्साहन मिळेल. असे केल्याने विद्यार्थी किमान एकातरी झाडाचे संगोपन करतील.

नेहमी स्वतःच्याच कार वापरू नका. कधीतरी सार्वजनीक वाहनांचाही वापर करा. प्लास्टीकच्या कॅरिबॉगच पूर्णतः बंद कराव्यात, तसा सरकारने आदेशच द्यावा. आपोआपच

सर्वजण कापडी बॅगा वापरतील. चहासाठी प्लॅस्टीकचे ग्लास बनविण्याऐवजी मातीचे छोटे ग्लास बनवूया. निदान त्या कुंभारांना तरी जास्त काम मिळेल. रेफ्रिजरेटरचा जितका होईल तितका कमीत कमी वापर करा. AC हवा आहे ना? आत्तापासून झाडे लावा. तुम्हाला नाही पण कदाचित तुमच्या मुलांच्या मुलांना तरी Natural AC मिळू शकेल. पेपर एकदा वापरले की लगेच फेकून देऊ नका. ते Recycling करून पुन्हा वापरू शकतो, आणि असे केले तर आपण २५०,०००,००० झाडांना जीवदान देऊ शकतो, आणि एक गोष्ट लक्षात ठेवा, वृक्ष हे उत्कृष्ठ फिल्टर आहेत.

बघा, जर या सर्व उपायांना आपण अमलात आणले, तर आपण ग्लोबल वार्मींग सारख्या भयानक प्राण्याला दूर पळवू शकतो. म्हणून बोलण्यापेक्षा कृती करा आणि ग्लोबल वार्मींगला दूर सारा. त्यासाठी एकच संदेश जतन कराः

If you want to live in a world of charming,
Work together and kill the giant of
**GLOBAL WARMING**!

**– पुजा भोसले**,
*अकरावी (विज्ञान),*
*ज.न.वि. कोल्हापूर*